## प्रेसनोट

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/ ३२० /२०२४ — पुणे दिनांक -१५/०१/२०२४

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे वतीने दिनांक १५/०१/२०२४ ते दिनांक ०२/०२/२०२४ रोजी पर्यंत मुंबई बेंगलोर हायवेवर सातारा लेनवर वारजे रोजरी स्कुल अंडरपास जवळ एक्सपान्शन जॉईंट दुरूस्तीचे काम करण्यात येणार आहे. सदरचे काम करताना वाहतूकीस अडथळा अगर काही प्रकार होवू नये याकरीता सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सदर परिसरातील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी शशिकांत बोराटे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, मुंबई ते सातारा बायपास रोडवरील वारजे रोजरी स्कुल अंडरपास जवळील परिसरातील वाहतूकीत खालीलप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात बदल करीत आहे.

- **दिनांक १५/०१/२०२४ ते दिनांक ०२/०२/२०२४ रोजी दरम्यान मुंबई ते सातारा बायपास रोडवरील वारजे रोजरी स्कुल अंडरपास जवळील साताऱ्याकडे जाणाऱ्या तीन लेनपैकी एक लेन बंद करण्यात येत असुन सदरची वाहतूक उर्वरीत दोन लेन व सर्व्हिस रोडवरून जाईल.**

13.1.24

(शशिकांत बोराटे)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक, पुणे शहर

प्रत:- सर्व संबंधीतांना